MHTH210000152026

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज कं.१/२०२६ चे नि.क्र.०१ खालील आदेश</u>**
**प्रणव भरतभाई पटेल व इतर —वि.— कोणीही नाही**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे मयत भरत भाईलालभाई पटेल यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील भरत भाईलालभाई पटेल यांचे दि. २३/०९/२०२२ रोजी निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारस आहेत. मयत भरत भाईलालभाई पटेल हे मयत झालेले असल्याने त्यांच्या नावे असलेली मौजे नारे, ता.वाडा, जि.पालघर येथील गट क्र. १७३/४, १७३/४/अ, १७३/६, १७३/१०, १७३/१३, १७३/१६, १७३/२०, १७३/२४, १७३/२६, १९४/२, १९४/३, १९४/४ व मौजे मेट, ता.वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१२६ यांच्या ७/१२ सदरी वारसाने नावाची नोंद करण्याकरिता अर्जदार यांनी मयत भरत भाईलालभाई पटेल यांचे वारस असल्याबाबत शासकीय कामांसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केलेली आहे.

३. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयामार्फत जाहिरनामा प्रसिद्ध

करण्यात आला आहे. तसेच सदर अर्जाच्या कामी त्रयस्थ व्यक्तींच्या हरकती आहे किंवा कसे यासाठी वर्तमानपत्रात जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरची जाहिर नोटीस अर्जदाराने अभिलेखावर दाखल केले आहे. मी त्याचे अवलोकन केले आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदार क्र.१ व २ करिता अर्जदार क्र.१ प्रणव भरतभाई पटेल यांनी आपल्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी ९ वर दाखल करून अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबी पुन्हा जशास तशा सांगितलेल्या आहेत. तसेच सदर अर्जाच्या कामी अर्जदारांनी वर्णन यादी निशाणी ३ सोबत अनुक्रमांक १ वर मयत भरत भाईलालभाई पटेल यांचे मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत निशाणी १२ वर, मयत वर्षाबेन पटेल यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची छायांकित प्रत निशाणी १८ वर, अर्जदार क्र.१ व २ यांच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत अनुक्रमे निशाणी क्र.१३ व १४ वर, तसेच वर्णन यादी निशाणी ६ वर अनुक्रमांक १ ते १३ वर अनुक्रमे मौजे नारे, ता.वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१७३/४, १७३/४/अ, १७३/६, १७३/१०, १७३/१३, १७३/१६, १७३/२०, १७३/२४, १७३/२६, १९४/२, १९४/३, १९४/४ व मौजे मेट, ता.वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१२६ यांच्या ७/१२ उता—यांची झेरॉक्स प्रत अनुक्रमे निशाणी क्र.१९ ते ३१ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदारांनी दि. १८/०३/२०२६ रोजीच्या ‘पुण्य नगरी’ या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन निशाणी क्र.१५ वर दाखल केले आहे.

५. अर्जदार क्र.१ व २ यांनी अर्जात व अर्जदार क्र.१ प्रणव भरतभाई पटेल यांनी आपल्या पुराव्याच्या शपथपत्रात कथन केल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील भरत भाईलालभाई पटेल हे दि.२३/०९/२०२२ रोजी मयत

झाले असून मयताच्या मृत्यूच्या दाखल्याची साक्षांकित प्रत त्यांनी निशाणी १२ वर दाखल केली आहे. तसेच मयत भरत भाईलालभाई पटेल यांची पत्नी मयत वर्षाबेन पटेल यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची छायांकित प्रत निशाणी १९ वर दाखल केली आहे. मयत भरत भाईलालभाई पटेल यांच्या नावे असलेली मौजे नारे, ता. वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१७३/४, १७३/४/अ, १७३/६, १७३/१०, १७३/१३, १७३/१६, १७३/२०, १७३/२४, १७३/२६, १९४/२, १९४/३, १९४/४ व मौजे मेट, ता.वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१२६ यांच्या ७/१२ उता—यांची झेरॉक्स प्रत अनुक्रमे निशाणी क्र.१९ ते ३१ वर दाखल केली आहे. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांनी आपले आधार कार्ड अभिलेखावर दाखल केले असून ते अनुक्रमे निशाणी १३ व १४ वर आहेत. अर्जदार क्र.१ यांचा तोंडी पुरावा व दाखल कागदपत्रे यावरून हे सिद्ध होते की, मयत भरत भाईलालभाई पटेल यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. तसेच अर्जदार यांना मयत भरत भाईलालभाई पटेल यांच्या पश्च्यात त्यांच्या नावे असलेल्या मिळकतींच्या ७/१२ सदरी त्यांच्या नावाची नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची गरज निर्माण झालेली आहे.

६. तसेच अर्जाच्या कामी त्रयस्थ व्यक्तींच्या हरकती आहे किंवा कसे यासाठी वर्तमानपत्रात जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असून अर्जात आजपावेतो हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदाराचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज विनाउजर व आक्षेपविना आहे. संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता व वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, अर्जदार क्र.१ व २ हे मयत भरत भाईलालभाई पटेल यांचे कायदेशीर वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करिता पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.१ प्रणव भरतभाई पटेल व अर्जदार क्र.२ अमिक्ष भरतभाई पटेल, दोघे रा.विला वी. बी. ९, आदर्श विहार, मार्वे रोड, आदर्श हाईट्स समोर, मुंबई हे **मयत भरत भाईलालभाई पटेल** यांचे कायदेशीर वारस आहेत असे निश्चित करण्यात येते.

३. अर्जदार यांनी अर्जात नमूद मौजे नारे, ता. वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१७३/४, १७३/४/अ, १७३/६, १७३/१०, १७३/१३, १७३/१६, १७३/२०, १७३/२४, १७३/२६, १९४/२, १९४/३, १९४/४ व मौजे मेट, ता. वाडा, जि.पालघर येथील गट क्र.१२६ यांचे बाजारभावाचे मुल्यांकनानुसार योग्य तो मुद्रांक शुल्क अदा करावा.

४. अर्जदार यांनी वरील प्रमाणे मुल्यांकन शुल्क अदा केल्याबाबत सहाय्यक अधीक्षक यांनी पडताळणी करून अर्जदार यांच्या लाभांत वरील मिळकतींकरिता वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. सदरचा आदेश हा वारस प्रमाणपत्र म्हणून कुठेही वापरात आणता येऊ शकत नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

NICHAL SHASHIKANT SURESH

Digitally signed by NICHAL SHASHIKANT SURESH
Date: 2026.08.13 17:32:54 +0530

**(शशिकांत सु. निचळ)**

दिनांक :१२/०८/२०२६

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वाडा